# पत हमी निधी योजना
# (Credit Guarantee Fund Scheme)

**पत हमी निधी** (Credit Guarantee Fund Scheme) योजनेची अंमलबजावणी ही केंद्रीय छोटया शेतक-यांचा कृषि व्यापार संघामार्फत व कर्जपुरवठा संस्थां/बँकांच्या मदतीने करण्यात येत आहे.

## पत हमी निधी योजनेची उदि्दष्टयेः

या निधीची उभारणी ही प्रामुख्याने पात्र कर्ज पुरवठादार संस्था किंवा बँकांनी शेतकरी उत्पादक कंपन्यांना करावयाच्या तारणमुक्त कर्ज पुरवठयामधील जोखीम कमी करण्यासाठी **रु.१००.०० लाख रकमेच्या मर्यादेत** पत हमीची सुरक्षा देण्यासाठी करण्यात आली आहे.

## पत हमी निधी निधी योजनेसाठी उत्पादक कंपनीच्या पात्रतेचे निकषः

पुढील पात्रता धारण करणा-या शेतकरी उत्पादक कंपन्या पतहमी निधी योजनेचा लाभ घेऊ शकतात.

- कंपनी कायद्याखालील कलमान्वये नोंदणी प्रक्रिया पूर्ण केलेल्या सर्व शेतकरी उत्पादक कंपन्या या योजनेसाठी पात्र ठरतील.
- कंपनीच्या ज्ञापन किंवा उप-विधीमध्ये नमूद केलेप्रमाणे कंपनीने आपले सभासदाकडून उभा केलेला समभाग निधी असणे आवश्यक आहे.
- शेतकरी उत्पादक कंपनीच्या वैयक्तिक भागभांडवल धारकांची संख्या ही ५०० पेक्षा कमी नसावी.
- शेतकरी उत्पादक कंपनीच्या एकूण भागधारक सभासदांपैकी किमान ३३ टक्के इतके भागधारक हे अत्यल्प, अल्प शेतकरी असावेत.
- संस्थात्मक भागधारकाशिवाय कोणत्याही एका वैयक्तिक भागधारकाचे शेतकरी उत्पादक कंपनीतील एकूण समभाग हे कंपनीच्या एकूण समभागाच्या ५ टक्के पेक्षा जास्त नसावेत.
- शेतकरी उत्पादक कंपनीचे नियुक्त/निवडून आलेले संचालक मंडळ असावे ज्यामध्ये शेतक-यांचे प्रतिनिधीत्व करणारे सभासदासह किमान एक महिला सभासद असावी.
- शेतकरी उत्पादक कंपनीची निवडून आलेली व्यवस्थापन समिती असावी.
- शेतकरी उत्पादक कंपनीचा व्यवसाय आराखडा व १८ महिन्याचे अंदाजपत्रक असावेत.
- शेतकरी उत्पादक कंपनीचा प्रस्ताव कर्ज पुरवठादार संस्थांकडे/बँकेकडे सादर झाल्यानंतर तसेच सदर कर्ज पुरवठादार संस्थेने/बँकेने अर्ज प्राप्तीनंतर सहा महिन्याच्या आंत लिखित स्वरुपात बँक कर्ज देण्याचे मान्य केलेले अथवा मुदत कर्ज किंवा खेळते भांडवल देण्यास तयार असलेबाबत कळवावे व त्यासाठी कोणत्याही तारण शिवाय किंवा सभासदाच्या वैयक्तिक तारणाशिवाय किंवा इतर पर्यायी हमीची गरज नाही.

## पतहमी निधी योजनेअंतर्गत पात्र पत सुविधा

पात्र पत सुविधा ही कोणत्याही तारणाशिवाय किंवा तृतीय पक्ष्याच्या हमी शिवाय अगोदरच मंजूर केलेले किंवा अर्ज केलेल्या तारखेपासून सहा महिन्याच्या आत सुराक्षा हमीसाठी मुदत वाढ दिलेली असावी. तसेच मुदत वाढ देण्याच्या हेतूने एका पेक्षा जास्त पत पुरवठा संस्था किंवा बँका यांनी एका पात्र उत्पादक संस्थेस मुदत कर्ज किंवा खेळते भांडवल किंवा एकत्रित कर्ज सुविधा वाढवू शकतात.तथापि,पत हमी ही या योजनेच्या अंतर्गत

नमूद केलेल्या पत हमी निधी योजनाच्या मर्यादेतच राहील आणि ही पत हमी कोणत्याही तारणाशिवाय किंवा तृतीय पक्ष्याच्या हमी शिवाय असेल.

**पत हमी सुरक्षा (Credit Guarantee Cover) :**

- एका शेतकरी उत्पादक कंपनीला पत सुविधा पुरविण्यासाठी पतपुरवठा करण्या-या बँका किंवा संस्थां यांना पाच वर्षात कमाल दोन वेळा या पत हमी सुरक्षा योजनेचा लाभ घेता येईल.
- पत सुविधा पुरविण्या-या संस्था किंवा बँका यांना एकूण पात्र व मंजूर पत सुविधेच्या ८५ टक्के पर्यंत किंवा रु.८५ लाख यापैकी जे कमी असेल तो पत हमी सुरक्षा निधी मिळेल.
- पात्र पत पुरवठा बँका /संस्था यांनी कराराप्रमाणे शेतकरी उत्पादक कंपनीस पतपुरवठा करतांना त्यांना पतहमी सुरक्षा अंतर्गत मिळणा-या रकमेत इतर कर, फी व सेवाकर जो त्यांनी शेतकरी उत्पादक कंपनीस लागू केलेला असेल त्याचा समावेश होणार नाही.
- कृषि व्यापार संघ यांनी वेळोवेळी निर्धारीत केलेल्या अटी व शर्ती अन्वये व पात्र पत पुरवठा करणा-या संस्था किंवा बँका (Eligible Lending Institutes) यांनी संबंधित छोटया शेतक-यांचा कृषि व्यापार संघाबरोबर केलेल्या करारानुसारच संबंधितास पत हमी सुरक्षा योजने अंतर्गत लाभ मंजूर करण्यात येईल.

**पत हमी निधी योजनेत सहभागी होण्यासाठी अर्ज प्रक्रियाः**

पत हमी निधी योजनेत सहभागी होण्यासाठी पात्र पत संस्था किंवा बँका (Eligible Lending Institutes) यांना केंद्रीय छोटया शेतक-यांचा कृषी व्यापार संघ यांचे विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक राहील. परंतु ज्या तिमाहीमध्ये त्यांनी शेतकरी उत्पादक कंपन्यांना मुदत कर्ज दिलेले असेल त्याच्या लगेचच पुढील तिमाहीची मुदत संपन्या अगोदर अर्ज करणे आवश्यक असते. उदा. पत सुविधा मंजूरी जर एप्रिल ते जून या तिमाहीत असेल तर छोटया शेतक-यांचा कृषी व्यापार संघाकडे पत हमी निधीच्या मंजूरीसाठी जुलै ते सप्टेंबर या तिमाहीची मुदत संपण्यापूर्वी अर्ज करणे आवश्यक राहील.

**पत हमी निधी मंजूरी -**

- योजनेच्या अटी व शर्तीनुसार पात्र पत पुरवठा संस्था किंवा बँका (Eligible Lending Institutes) यांचेकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावाची छाननी केल्यानंतरच केंद्रीय छोटया शेतक-यांचा कृषी व्यापार संघ पतहमी निधीची हमी देईल.
- आवश्यकतेनुसार व योजनेच्या हेतू प्रमाणे केंद्रीय छोटया शेतक-यांचा कृषी व्यापार संघ हे कर्ज पुरवठादार संस्था/बँका (Eligible Lending Institutes) यांचे लेखे संदर्भातील दस्तऐवज तपासू शकतात किंवा दस्तऐवजाच्या प्रती मागवू शकतात किंवा कर्जदार कंपनीच्या संदर्भातील लेखाविषयक दस्तऐवज पत पुरवठादार संस्थेच्या माध्यमातुन मागावू शकतात
- अशा प्रकारची छाननी ही छोटया शेतक-यांचा कृषी व्यापार संघाचे अधिकारी यांचेमार्फत किंवा त्यांनी प्राधिकृत/नियुक्त केलेल्या यंत्रणेच्या माध्यमातून करुन घेवू शकतील.
- वरील छाननीच्या आधारे छोटया शेतक-यांचा कृषी व्यापार संघा अंतर्गत (Investment and Claim Settlement Comimittee (I&CSC) समितीद्वारे पतहमी निधीची रक्कम मंजूर करण्यात येईल.

- पत पुरवठा करणारी संस्था/बँका यांनी त्यांच्या बँक/शाखा स्तरावर किंवा शाखा व्यवस्थापक स्तरावर छोटया शेतक-यांचा कृषी व्यापार संघाबरोबर करार करणे आवश्यक राहील.

**हमी शुल्क :**

- पत पुरवठा संस्था किंवा बँका (Eligible Lending Institutes) यांनी पत हमी निधी योजने अंतर्गत शेतकरी उत्पादक कंपनी या कर्जदारास पत सुविधा पुरविलेली असल्यास पत पुरवठादार संस्थांनी छोटया शेतक-यांचा कृषी व्यापार संघाकडे एकदाच अदा करावयाच्या ०.८५ टक्के दराने हमी शुल्क जास्तीत जास्त (रु.८५,०००/-) एवढे भरणे आवश्यक राहील.
- पत हमी निधी योजने अंतर्गत सुरक्षा मिळविण्यासाठी पत पुरवठादार संस्था किंवा बँकामार्फत छोटया शेतक-यांचा कृषी व्यापार संघ यांचेकडे पत हमी निधीची मंजूरी मिळाल्यापासून ३० दिवसांचे आत हमी शुल्क भरणे आवश्यक असून तसे न केल्यास पत हमी निधीची सुरक्षा ही संबंधित पत पुरवठा बँकेस मिळू शकणार नाही व त्यासाठी त्यांना छोटया शेतक-यांचा कृषी व्यापार संघाकडून पुनश्च मंजूरी घ्यावी लागेल.

पात्र पत पुरवठादार संस्था/बँका यांचेकडून हमी शुल्क स्विकारल्यानंतर छोटया शेतक-यांचा कृषी व्यापार संघ पुढील बाबींची खातरजमा करील.

- अर्जदार संस्थेने पत पुरवठा करणा-या संस्थेकडे जमा करावयाचे कोणतेही हप्ते हे थकीत नसावेत.NPA(Non Performing Assetts) थकीत कर्जाचे कुठल्याही वेळी पुनर्गठन झालेले नसावे
- ज्या व्यवसायासाठी कर्ज पुरवठादार संस्थेने कर्जदार संस्थेस कर्ज पुरवठा केलेला आहे तो चालू असणे आवश्यक असून तो बंद पडलेला नसावा.
- कर्जदार कंपनी/संस्थेने कर्ज घेतल्यानंतर त्याची सर्व रक्कम किंवा त्याचा काही भाग व्यवसायासाठी वापरला पाहिजे तो निधी इतर संस्थाचे कर्ज हप्ते परत करण्यासाठी वापरला असल्यास तो शंकास्पद मानला जाईल.

**वार्षिक सेवा शुल्कः**

एकदाच अदा करावयाच्या हमी शुल्काशिवाय वार्षिक सेवा शुल्क ०.२५ टक्के प्रति वर्ष किंवा वेळोवेळी ठरविण्यात आलेले शुल्क पात्र पतपुरवठा सस्थांकडून सुरक्षा हमीची सुविधा चालू ठेवण्यासाठी आकारण्यात येईल. हे दोन्ही प्रकारचे सेवा शुल्क हे कर्जदाराकडून वसूल करावे किंवा करण्यात येऊ नये त्याबाबत सेवा पुरवठादार संस्था निर्णय घेईल.वार्षिक सेवा शुल्क हे पुरवठा संस्थेने छोटया शेतक-यांचा कृषी व्यापार संघाकडे प्रत्येक वर्षी ३१ मे पर्यंत अदा करावे.

पतपुरवठादार संस्था किंवा बँका (Eligible Lending Institutes) यांनी छोटया शेतक-यांचा कृषी व्यापार संघ यांचेकडे वार्षिक सेवा शुल्क वेळीच भरले नसल्यास योजने अंतर्गत त्यांना मिळणारे छोटया शेतक-यांचा कृषी व्यापार संघ यांचेकडील पत हमीची सुरक्षा संपुष्टात येईल व ती पुनश्च सुरु करण्यासाठी विशेष दंडात्मक व्याजासह जे वार्षिक सेवा शुल्काच्या दरापेक्षा १ टक्क्यानी जास्त असेल व कर्जदारास आकारलेल्या व्याज दरापेक्षा जास्त असेल किंवा विलंबाचा कालावधीनुसार छोटया शेतक-यांचा कृषी व्यापार संघाने वेळोवेळी घेतलेल्या निर्णयानुसार असेल. सदर सेवा शुल्क प्राप्त झाल्यानंतर पत हमी निधीची सुरक्षा व हमी पुढे चालू ठेवण्यात आल्याचे मानन्यात येईल.

ठरवून दिलेल्या वेळेत किंवा पात्र सेवा पुरवठादार संस्थांनी वाढवून घेतलेल्या वेळेतही जर वार्षिक सेवा शुल्क भरले नसल्यास पत हमीची जबाबदारी राहणार नाही.परंतु छोटया शेतक-यांचा कृषी व्यापार संघ हे पत हमी निधी नूतनीकरणा बाबत काही अटी व शर्तीनुसार पुनश्च निर्णय घेऊ शकेल.परंतु आर्थिक सेवा शुल्क

भरण्यात विसंगती व त्रुटी आढळल्यास.सेवा पुरवठादार संस्थांनी भरलेली हमी शुल्क किंवा वार्षिक सेवाशुल्क इत्यादीची रक्कम परत करता येणार नाही.

**योजनेअंतर्गत कर्ज पुरवठादार संस्था/बँकाची (Eligible Lending Institutes) जबाबदारी.**

कर्ज पुरवठादार संस्था/बँका (Eligible Lending Institutes) यांनी केंद्रीय छोटया शेतक-यांचा कृषि व्यापार
संघ यांचेकडे प्रस्तावांची शिफारस करण्यापूर्वी घ्यावयाची काळजी.

- प्रत्येक कर्ज प्रस्ताव हा उत्पादनशील व्यवसाय प्रकल्प असल्याची खात्री करावी. त्याचबरोबर बँकांनी पत हमी निधीसाठी अर्ज करतांना त्याबरोबर बँकांनी प्रकल्पाच्या किंमतीची माहिती देणे आवश्यक राहील.
- छोटया शेतक-यांचा कृषि व्यापार संघाच्या अटी व शर्ती त्याचप्रमाणे पत पुरवठादार बँका यांचे आवश्यकते प्रमाणे पत हमी निधीच्या मंजूरीची कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करावी.
- योजने अंतर्गत मंजूरीसाठी छोटया शेतक-यांचा कृषि व्यापार संघास आवश्यक असणारे सर्व महत्वाचे दस्तऐवज बँकानी केंद्रीय छोटया शेतक-यांचा कृषि व्यापार संघ यांना सादर करणे आवश्यक राहील व सर्व दस्तऐवज प्रमाणित केलेले असावेत.

**प्रकल्प विकास सुविधाः (Project Development Facility)**

समभाग निधी व पतहमी निधी या योजनांतर्गत केंद्रीय छोटया शेतक-यांचा कृषी व्यापार संघाने नियुक्त केलेल्या मान्यताप्राप्त सल्लागार संस्था यांचेकडून शेतकरी उत्पादक कंपन्यांना योजने अंतर्गत अर्ज करणे, प्रकल्प अहवाल तयार करणे यासाठी आर्थिक सहाय्य देय आहे.

वरील दोन्ही योजनांच्या सविस्तर माहितीसाठी केंद्रीय छोटया शेतक-यांचा कृषी व्यापार संघ, नवी दिल्ली यांच्या www.sfacindia.com या संकेतस्थळास भेट द्यावी.